# रात्रीच्या वेळी सूर्यप्रकाश विकण्याची तयारी

## अंतराळात लावले जाणार मोठे आरसे
## भारताची स्कायरूट एअरोस्पेस, यूएस स्टार्टअपचा प्रकल्प

**वॉशिंग्टन–** अमेरिकन स्पेस टेक्नॉलॉजी कंपनी रिफ्लेक्ट ऑर्बिटल रात्रीच्या वेळी पृथ्वीवरील निवडक ठिकाणी सूर्यप्रकाश विकण्याची तयारी करत आहे. यासाठी पृथ्वीच्या कक्षेत मोठे आरसे बसवले जातील.

कॅलिफोर्नियातील ही स्टार्ट-अप कंपनी भारतातील स्कायरूट एरोस्पेसच्या मदतीने उपग्रह प्रक्षेपित करणार आहे. दोन्ही कंपन्यांमध्ये दोन प्रक्षेपणांसाठी करार झाला आहे. या उपग्रहांच्या मदतीने आपत्तीग्रस्त भागांमध्ये शोध आणि बचाव मोहिमांसाठी प्रकाश उपलब्ध करून देता येईल. सौरऊर्जा प्रकल्पांमध्ये वीज निर्मितीचा कालावधीही वाढवता येईल.

**दोन प्रक्षेपणांसाठी झाला करार**

रिफ्लेक्ट ऑर्बिटलने हैदराबादमध्ये स्कायरूट एरोस्पेससोबत दोन प्रक्षेपणांसाठी करार केला आहे. दोन्ही प्रक्षेपणे विक्रम रॉकेटद्वारे केली जातील. कंपनीने निवेदनात म्हटले, या प्रक्षेपणांमुळे अमेरिकेतील इतर नियोजित प्रक्षेपण सेवांसोबत आम्हाला निश्चित वेळापत्रक आणि क्षमता मिळेल. स्कायरूट एरोस्पेसचे सीईओ पवन चंदाना म्हणाले, रिफ्लेक्ट ऑर्बिटल अंतराळ तंत्रज्ञानाच्या सर्वात नवीन वापरांपैकी एकावर काम करत आहे. स्कायरूट ए सोबत पृथ्वीवर मागणीनुसार सूर्यप्रकाश देण्याची त्यांची योजना लॉन्च करण्याची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत.

**पाच किलोमीटरच्या परिसरात देता येणार प्रकाश**

जुलैमध्ये रिफ्लेक्ट ऑर्बिटलला फेडरल कम्युनिकेशन्स कमिशन ऋऊउ कडून एक प्रात्यक्षिक उपग्रह तयार करणे, लॉन्च करणे आणि त्याचे संचालन करण्याची मंजुरी मिळाली होती. स्टार्ट-अपचे उद्दिष्ट असा प्रकाश देणे आहे, जो कधीही बंद करता येईल. त्याची तीव्रता बदलता येणार असून तो पाच किलोमीटरच्या क्षेत्रात पसरेल.कंपनीच्या मते, मागणीनुसार उपलब्ध होणारा हा प्रकाश दुर्गम औद्योगिक भागांमधील कामाचे तास वाढवू शकतो. यामुळे संरक्षण मोहिमांमध्ये महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना प्रकाशित करण्यास मदत होऊ शकते.

**पहिले लॉन्च विक्रम-१ रॉकेटद्वारे होणार**

रिफ्लेक्ट ऑर्बिटलचे सह-संस्थापक आणि एफसीसी बेन नोव्हॅक यांनी सांगितले, नवीन प्रक्षेपण सेवा प्रदाता स्कायरूटसोबत काम करण्यास आम्ही उत्सुक आहोत. यामुळे अंतराळापर्यंत पोहोच सुनिश्चित करण्यात मदत होईल.

या कराराअंतर्गत पहिले प्रक्षेपण विक्रम-१ रॉकेटद्वारे केले जाईल. दुसरे प्रक्षेपण स्कायरूटच्या विक्रम-१ण प्रक्षेपण वाहनाद्वारे केले जाईल. विक्रम-१ण मध्ये पहिल्या टप्प्यात अतिरिक्त बूस्टर बसवण्यात आले आहेत. नोव्हॅक यांनी सांगितले, आमच्या पहिल्या अंतराळयानाचे संचालन करण्यासाठी आम्हाला नुकताच फेडरल कम्युनिकेशन्स कमिशनकडून परवाना मिळाला आहे. आम्ही खगोलशास्त्रज्ञ, स्थानिक समुदाय आणि नियामकांसोबत काम सुरूच ठेवू. यामुळे मोठ्या प्रमाणावर विस्ताराची परवानगी मिळवण्यास मदत होईल.

# कृषी विद्यापीठात बनावट सातबारा सादर करून कृषितंत्र पदविका मान्यतेचा प्रयत्न?

## विद्यापीठाच्या स्थळ पाहणी समितीच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह; कुलगुरूंकडे तक्रार

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या अखत्यारीत कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील एका सेवाभावी संस्थेने १० हेक्टर ९६ आर जमीन असल्याचे दर्शविणारा संशयास्पद सातबारा उतारा सादर केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. महसूल विभागातील मूळ अभिलेख, सातबारा उतारे आणि फेरफार नोंदींच्या आधारे संबंधित संस्थेच्या नावावर एवढी जमीन नसल्याचा दावा तक्रारदार शेतकऱ्यांनी केला आहे.

या प्रकरणात विद्यापीठाच्या स्थळ पाहणी समितीने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी न करताच सकारात्मक अहवाल दिल्याचाही आरोप करण्यात आला असून, यासंदर्भात कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथील अनिरुद्ध सेवाभावी संस्थेने दोन वर्षांचा मराठी माध्यमातील कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावासोबत संस्थेच्या मालकीची १० हेक्टर ९६ आर जमीन असल्याचे दर्शविणारा सातबारा उतारा जोडण्यात आल्याचे तक्रारीत म्हंटले आहे. मात्र, महसूल विभागातील उपलब्ध मुळ अभिलेख आणि फेरफार नोंदींच्या पडताळणीत संस्थेच्या नावावर एवढे क्षेत्र नसल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

तक्रारीनुसार, संबंधित संस्थेने येवला तालुक्यातील खामगाव येथे केवळ १ हेक्टर ९६ आर जमीन भाडेपट्ट्याने घेतल्याचे दिसून येते. तसेच, ऑक्टोबर २०२५ मध्ये येवला तहसीलदारांनी संबंधित जमिनीचा सातबारा बंद करण्याचा आदेश दिल्याचाही दावा करण्यात आला आहे. असे असताना १० हेक्टर ९६ आर क्षेत्र दर्शविणारा सातबारा विद्यापीठाकडे कसा सादर झाला, त्याची निर्मिती कोणी केली आणि त्याची अधिकृत पडताळणी झाली होती का, असे प्रश्न या तक्रारीमुळे उपस्थित झाले आहेत.

विद्यापीठाच्या कुलगुरूंनी ९ जून २०२५ रोजी स्थळ पाहणी समितीला मान्यता दिल्यानंतर १९ ऑगस्ट २०२५ रोजी खामगाव येथे प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली होती. या समितीत डॉ. पी. एस. बोडके, प्रा. डॉ. पी. बी. खर्डे आणि डॉ. जी. के. ढेमरे यांचा समावेश होता. मात्र, संबंधित जमिनीचे मूळ सातबारा उतारे आणि महसूल विभागातील अधिकृत अभिलेख तपासण्यात आले नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

आवश्यक जमीन आणि संबंधित निकषांची खातरजमा न करताच संस्थेची जागा भौतिक व शैक्षणिकदृष्ट्या सुसज्ज असल्याचा सकारात्मक अहवाल देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या अहवालाच्या आधारे विद्यापीठ प्रशासनाची दिशाभूल झाली का, याची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. या अहवालावर विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीत आक्षेप घेण्यात आल्यानंतर पुनर्पाहणी समिती गठित करण्यात आल्याचेही समोर आले आहे.

डॉ. व्ही. एल. अमोलिक यांच्या अध्यक्षतेखालील पुनर्पाहणी समितीत डॉ. बी. डी. रोमाडे, डॉ. एल. एन. तागड आणि दत्तात्रय उगले यांचा समावेश करण्यात आला होता. या समितीने ६ मे २०२६ रोजी पुन्हा स्थळ पाहणी केली. मात्र, या वेळीही आवश्यक कागदपत्रांची स्वतंत्रपणे पडताळणी न करता पूर्वीच्या बोडके समितीचा अहवाल केवळ सह्या बदलून सादर करण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

पहिल्या स्थळ पाहणीवेळी कोणती कागदपत्रे तपासण्यात आली, सकारात्मक अहवाल देताना कोणते निकष विचारात घेण्यात आले आणि पुनर्पाहणीदरम्यान महसुली अभिलेखांची स्वतंत्र खातरजमा करण्यात आली का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी तक्रारदारांनी केली आहे.

या प्रकरणातील संशयास्पद सातबारा उतारा, जमिनीची प्रत्यक्ष मालकी व उपलब्धता आणि स्थळ पाहणी समित्यांच्या अहवालांची सत्यता यांची सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच, दोषी आढळणाऱ्यांवर १५ दिवसांच्या आत निलंबनासह फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी कुलगुरूंकडे दाखल केलेल्या लेखी तक्रारीत केली आहे.

कृषी शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातील अभ्यासक्रमाला मान्यता देताना जमीन, बांधकाम, पायाभूत सुविधा आणि अन्य आवश्यक निकषांची काटेकोर तपासणी होणे अपेक्षित आहे. त्यामुळे या प्रकरणात सादर करण्यात आलेल्या सातबारा उताऱ्याची सत्यता, संबंधित जमिनीची कायदेशीर स्थिती आणि स्थळ पाहणी समित्यांनी अहवाल देताना अवलंबलेली प्रक्रिया यांची निष्पक्ष चौकशी होणे महत्त्वाचे ठरणार आहे. या आरोपांबाबत विद्यापीठ प्रशासनाची अधिकृत भूमिका आणि चौकशीतून समोर येणारे निष्कर्ष याकडे आता शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# संगमनेर सॅफ्रॉन सफायरतर्फे चित्रकला स्पर्धेचे आयोजन

## जागतिक शांतता विषय; विद्यार्थ्यांना प्रवेश विनामूल्य

**संगमनेर (प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांमध्ये जागतिक शांततेचे महत्त्व रुजविण्यासह त्यांच्या कलागुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सफायरतर्फे 'जागतिक शांतता' या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे १८ वे वर्ष असून, उद्या (रविवार दि.१८) सकाळी ९.३० वाजता मालपाणी लॉन्स संगमनेर येथे ही स्पर्धा होणार आहे. विद्यार्थ्यांसाठी स्पर्धेतील प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

जागतिक स्तरावर शांतता, बंधुभाव, सहिष्णूता आणि मानवतेचा संदेश चित्रकलेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीला रंगांच्या माध्यमातून अभिव्यक्त करावे, तसेच बालवयापासूनच त्यांच्या मनात शांतता आणि सामाजिक सलोख्याचे संस्कार रुजावेत, या हेतूने लायन्स क्लब ऑफ संगमनेर सफायर सातत्याने हा उपक्रम राबवत असल्याचे संस्थापक अध्यक्ष गिरीश मालपाणी व माजी अध्यक्ष श्रीनिवास भंडारी यांनी सांगितले.

स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे पाच गट करण्यात आले असून, प्रत्येक गटातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक एक हजार रुपये व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक ७०० रुपये व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक ५०० रुपये व प्रमाणपत्र, तर चतुर्थ, पाचवे आणि उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून प्रत्येकी २०० रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अशाप्रकारे एकूण १४ हजार रुपयांची पारितोषिके वितरित केली जाणार आहेत. स्पर्धेसाठी चित्र पूर्ण करण्याकरिता दोन तासांचा कालावधी देण्यात येणार आहे. चित्रासाठी आवश्यक ड्रॉइंग शीट आयोजकांकडून उपलब्ध करून दिली जाणार असून, रंग, पेन्सिल आणि इतर चित्रकला साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणायचे आहे. वॉटरकलर, क्रेयॉन, पेन्सिल कलर यांसारख्या विविध माध्यमांचा वापर करून विद्यार्थ्यांना आपली कलाकृती साकारता येणार आहे. या स्पर्धेला मालपाणी ग्रुप, संगमनेर यांचे सौजन्य लाभले आहे. प्रकल्प प्रमुख म्हणून सुनीता मालपाणी, डॉ. जितेंद्र पाटील, देविदास गोरे आणि निशांत काळे काम पाहत आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्लबचे अध्यक्ष जितेश लोढा, सचिव नम्रता अभंग आणि खजिनदार चंद्रशेखर गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली क्लबचे पदाधिकारी व सदस्य प्रयत्नशील आहेत.

# मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी

**नवी दिल्ली–** सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेतली आणि संबंधित केंद्र सरकारच्या मंत्रालयांकडून प्रतिसाद मागवला. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने या प्रकरणी नोटीस बजावली असून, पुढील सुनावणी ७ डिसेंबर रोजी निश्चित केली आहे.

ही जनहित याचिका इंदूरमधील एमराल्ड हाइट्स इंटरनॅशनल स्कूल आणि त्याचे संचालक सिद्धार्थ सिंग यांनी दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील खुशबू जैन हजर होत्या, तर ही याचिका वैभव चौधरी यांनी दाखल केली. केंद्र सरकार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, महिला आणि बाल विकास मंत्रालय, कायदा आणि न्याय मंत्रालय आणि राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग यांना या याचिकेत पक्षकार बनवण्यात आले आहे. याचिकेत म्हटले आहे की, मुलांना सोशल मीडियाच्या धोक्यांपासून वाचवणे ही सरकारची घटनात्मक जबाबदारी आहे. ही जबाबदारी केवळ पालकांच्या देखरेखीवर किंवा सोशल मीडिया कंपन्यांच्या ऐच्छिक सुरक्षा उपायांवर सोपवता येणार नाही. याचिकाकर्त्यांनी मुलांच्या संरक्षणासाठी सर्वसमावेशक आणि प्रभावी नियम तयार करण्याची मागणी केली आहे.

याचिकेत म्हटले आहे की, सोशल मीडियामुळे मुलांमध्ये तणाव, नैराश्य, चिंता, कमी आत्मविश्वास, झोपेच्या समस्या आणि शारीरिक प्रतिमेबद्दलच्या समस्या वाढू शकतात. याव्यतिरिक्त, सायबरबुलिंग, लैंगिक शोषण, खाजगी फोटोंद्वारे ब्लॅकमेलिंग, हिंसक आणि अश्लील सामग्रीची उपलब्धता, आणि आत्महत्येशी संबंधित सामग्री हे गंभीर धोके आहेत. सोशल मीडियाचा सतत वापर करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या प्लॅटफॉर्मच्या रचनेबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

# आरडगाव येथे शेतजमिनीच्या वादातून मारहाण करून धमकी; दहा जणांवर गुन्हा दाखल

**राहुरी (प्रतिनिधी)–** शेतजमिनीची मशागत करण्यास विरोध करत शिवीगाळ करून बांबू, लोखंडी पाइप, दगड तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील आरडगाव येथे ११ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बापूसाहेब अशोक धसाळ (रा. आरडगाव, ता. राहुरी) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, आरडगाव शिवारातील शेजारील शेतजमीन बापूसाहेब धसाळ व इंद्रभान यादव झुगे यांनी ८ ऑक्टोबर रोजी गाढवे कुटुंबीयांकडून खरेदी केली होती. या जमिनीच्या लगत बाळासाहेब आटोळे यांची शेतजमीन आहे.

११ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास बापूसाहेब धसाळ, इंद्रभान झुगे, आदित्य झुगे व यश झुगे हे खरेदी केलेल्या शेतजमिनीची मशागत करण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपींनी तेथे येऊन, गाढवे यांची शेतजमीन आपण वाट्याने करत असून ती आपल्या ताब्यात आहे, त्यामुळे येथे मशागत करू नका, असे सांगितले. यावर धसाळ यांनी संबंधित जमीन गाढवे यांच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले. याचा राग आल्याने आरोपींनी शिवीगाळ करत बांबू, लोखंडी पाइप, दगड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या मारहाणीच्या वेळी इंद्रभान झुगे यांच्या हातातील आठ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी पडून गहाळ झाली. याप्रकरणी बापूसाहेब अशोक धसाळ यांच्या फिर्यादीवरून दीपक बाळासाहेब आटोळे, विजय संभाजी आटोळे, मोहन संभाजी आटोळे, किरण विजय आटोळे, नंदा विजय आटोळे, रेणुका मोहन आटोळे, मयुरी दीपक आटोळे, प्रियंका सचिन आटोळे, अजिंक्य मोहन आटोळे व प्रदीप विजय आटोळे (सर्व रा. आरडगाव, ता. राहुरी) या दहा जणांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ११६९/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली शिवीगाळ, मारहाण व धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इथेनॉलमध्ये साखरेच्या वापरावर बंदी

**मुंबई–** सणासुदीचा हंगाम सुरु होण्यापूर्वीच, साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. यामुळं ग्राहकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. परिणामी, साखरेच्या उपलब्धतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर, साखरेची टंचाई आणि किमतींमधील अस्थिरता टाळण्यासाठी सरकारने आता एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने इथेनॉल उत्पादनात साखरेच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जारी केलेल्या नवीन निविदेमध्ये, साखरेचा वापर करून इथेनॉल उत्पादनासाठीच्या परवानग्या बंद केल्या आहेत.

## पान १ वरुन

### खासगी रुग्णालयांना उपचाराचे दरपत्रक बंधनकारक

दरांबाबत रुग्णांना पुरेशी माहिती द्यावी. नोंदणी कक्ष, चौकशी कक्ष आणि बिलिंग काउंटरवरील कर्मचाऱ्यांनी रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांना दरपत्रक तसेच शुल्काबाबत योग्य मार्गदर्शन करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे बिलांबाबत निर्माण होणारा संभ्रम आणि तक्रारी कमी होण्यास मदत होणार आहे.

वैद्यकीय व्हिसा किंवा आयुष व्हिसावर भारतात उपचारासाठी येणाऱ्या परदेशी रुग्णांना सेवा देणाऱ्या रुग्णालयांनी त्यांच्यासाठी लागू असलेले विशेष उपचार पॅकेजचे दरही स्पष्टपणे प्रदर्शित करावेत, असे परिपत्रकात निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

### पोलिसांनी सीजेपीची तिरंगा रॅली रोखली

करण्यात आली होती.

अटकेपूर्वी दिपके यांनी एक व्हिडिओ संदेश जारी केला, ज्यात ते म्हणाले, दिल्ली पोलिसांचे सात-आठ अधिकारी आले होते. ते म्हणाले की तुम्ही लोकांना भडकवत आहात. तुम्ही तिरंगा फडकवायला जाऊ शकत नाही. याचा अर्थ असा की, तुम्हाला तुमच्याच देशात तिरंगा फडकवण्यास मनाई केली जात आहे.

### सुजय विखे यांच्या बाजूने, विरोधात कायद्याचा 'कीस'

(दि.१६) या प्रकरणाची सुनावणी झाली. डॉ. विखे पाटील यांची उमेदवारी कायम ठेवण्याच्या बाजूने आणि त्यांच्या अर्जाला आक्षेप घेणाऱ्या पक्षाकडून कायदेशीर तरतुदींचा आधार घेत युक्तिवाद करण्यात आला. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वतीने ॲड. विनायक होन यांनी बाजू मांडली. डॉ. विखे हे राहुरी सहकारी साखर कारखान्याचे निवडून आलेले संचालक नसून, केवळ तज्ज्ञ संचालक होते, असा युक्तिवाद त्यांनी केला. कारखान्याच्या संचालक मंडळाला तांत्रिक अडचणींच्या वेळी तज्ज्ञ म्हणून सल्ला देण्यापुरतीच त्यांची भूमिका होती. जिल्हा बँकेने कारखान्याला दिलेल्या कर्जासाठी त्यांना वैयक्तिकरीत्या जबाबदार धरता येणार नाही, असे त्यांनी न्यायालयात सांगितले. डॉ. विखे यांच्याकडे वैयक्तिक थकबाकी असती, तर जिल्हा बँकेने त्यांना त्यासंदर्भात स्वतंत्र नोटीस दिली असती, असा मुद्दाही त्यांच्या वकिलांनी उपस्थित केला. तसेच, निवडणूक प्रक्रियेतील संबंधित टप्पा आणि कायदेशीर तरतुदींचा विचार करता, घोगरे यांची याचिका ग्राह्य धरता येणार नसल्याचा दावा करत ती फेटाळण्याची मागणी करण्यात आली.

दुसरीकडे, एकनाथ घोगरे यांच्यावतीने ॲड. प्रतीक तलवार आणि ॲड. रिशाब तलवार यांनी युक्तिवाद केला. डॉ. विखे हे २०१७ ते २०२३ या कालावधीत राहुरी सहकारी साखर कारखान्याचे तज्ज्ञ संचालक होते. कारखान्याने जिल्हा बँकेकडून कर्ज घेतले, त्या वेळीही ते या पदावर होते, असे घोगरे यांच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. कर्जप्रकरणाशी संबंधित कागदपत्रांवर डॉ. विखे यांच्या सह्या असल्याचा दावा करत, त्यांच्यासह इतर संचालकांनी वैयक्तिक हमी दिल्याचेही त्यांनी नमूद केले. सहकारी संस्थेच्या थकबाकीशी संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार थकबाकीदार व्यक्तीला सहकारी संस्थेची निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविता येते, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यामुळे डॉ. विखे यांच्या उमेदवारीची पात्रता तपासताना या बाबींचा विचार करावा, अशी भूमिका घोगरे यांच्या वकिलांनी मांडली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या वतीने ॲड. योगेश कदम यांनी बाजू मांडली. संबंधित प्रकरणात कायद्याला अभिप्रेत असलेली संक्षिप्त चौकशी करूनच निर्णय घेण्यात आल्याचे सांगत त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या भूमिकेचे समर्थन केले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने ॲड. सुभाष तांबे यांनी काम पाहिले.

दोन्ही बाजूंच्या वकिलांनी सुमारे दोन तास युक्तिवाद केल्यानंतर सुनावणी पूर्ण झाली. आता हे प्रकरण निर्णयासाठी ठेवण्यात आले आहे. पुढील आठवड्यात न्यायालयाकडून निर्णय अपेक्षित असल्याने डॉ. विखे पाटील यांच्या उमेदवारीबाबत कायदेशीर चित्र स्पष्ट होण्याची प्रतीक्षा आहे. या निकालाचा परिणाम जिल्हा बँकेच्या निवडणूक प्रक्रियेवर काय होतो, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

डॉ. विखे यांच्यावतीने ॲड. विनायक होन यांच्या ॲड. अभय ओस्तवाल, चंद्रभान घोगरे यांचे वतीने ॲड. प्रतिक तलवार व ॲड रिशाब तलवार यांनी काम पाहिले. त्यांना नगरचे वकिल ॲड. सुरेश लगड यांनी सहाय्य केले. महाराष्ट्र सरकारच्या वतीने ॲड. सुभाष तांबे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे वतीने ॲड. योगेश कदम यांनी काम पाहिले.

### वैयक्तिक लाभार्थ्यांना ४ हजार, शेतकरी गटांना २० हजारांचे चारा बियाणे

मर्यादेत १०० टक्के अनुदानावर चार हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. संबंधित लाभार्थ्याकडे चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्यास आणि प्रथमच लाभ मागणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्यास, एकापेक्षा अधिक वेळा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**शेतकरी गटांना २० हजार रुपयांपर्यंत लाभ**

शेतकरी समूह किंवा गटांना पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर २० हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असलेल्या गटांना, प्रथमच लाभ मागणाऱ्या अर्जदारांची मागणी पूर्ण झाल्यानंतर, उपलब्धतेनुसार एकापेक्षा अधिक वेळा बियाणे वाटप करता येणार आहे.

सर्वसाधारणपणे ही योजना वर्षातून एकदाच राबविण्यात येते. मात्र, सध्याची दुष्काळी परिस्थिती विचारात घेऊन चारा उत्पादनासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्याची खातरजमा केल्यानंतर अतिरिक्त लाभ देण्याची सवलत देण्यात आली आहे. यासाठी संबंधित उपायुक्त पशुसंवर्धन यांनी पाणीसाठा उपलब्ध असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे. तसेच, प्रथमच लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्याची खात्री करण्याचे निर्देश जिल्हा व विभागीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. योजनेबाबत अधिक माहितीसाठी पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर क्रमांकावर किंवा ९०६३१४२२९९ या व्हॉट्सप चॅटबॉट क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

दुष्काळजन्य परिस्थितीत पशुपालकांना आर्थिक दिलासा देणे आणि चाऱ्याचा तुटवडा जाणवू न देणे यासाठी शासन कटिबद्ध आहे. अटी शिथिल केल्यामुळे सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त चारा उत्पादन घेता येईल. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, असे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

### नराधम विजय खैरनारला फाशीची शिक्षा

कुटुंबीय, मंत्री दादा भुसे यांच्यासह सामाजिक, राजकीय संघटना पदाधिकारी कार्यकर्ते हे देखील कोर्टाच्या परिसरात उपस्थित होते. तर पीडितेकडून विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांच्यासह ॲड. स्नेहा शर्मा ठाकरे, ॲड. संजय सोनवणे यांनी काम बघितल्याची माहिती आहे. तर आरोपीकडून ॲड.राठी यांनी कामकाज बघितले. आता आरोपीला उच्च न्यायालयात ३० दिवसांच्या आत दाद मागता येऊ शकते, अशी देखील माहिती आहे.

मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे १६ नोव्हेंबर २०२५ ला साडेचार वर्षीय चिमुरडीवर २१ वर्षीय विजय खैरनार या नराधमाने लैंगिक अत्याचार करत तिचा गळा आवळून अमानुषपणे खून केला होता. मालेगाव तालुका पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करुन सुरुवातीस २३ दिवसांत ४२५ पानांचे आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. या खटल्यात आतापर्यंत पोलीस, ग्रामस्थ, पिडीताचे कुटुंब, वैद्यकीय अधिकारी आदीं २४ साक्षीदार तपासण्यात आलेले असून शासन नियुक्त विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी भक्कम पुराव्याच्या आधारेन्यायालयात मांडणी केली आहे. दरम्यान, मागील सुनावणीत आरोपी विजय खैरनार याचेवर दोष निश्चिती करण्यात आलेली असून न्यायालयाने त्याचे म्हणणे मांडण्याची देखील संधी त्याला उपलब्ध करून दिली होती. तसेच पोलीस, मानसोपचार तज्ञ व जेलर यांचेकडून त्याचे वर्तणुकीबाबत अहवाल कोर्टात सादर करण्यात आले होते.

### माघारीसाठी आता तीनच दिवस शिल्लक

होते. यात १६ ऑक्टोबरला १० उमेदवारांनी अर्ज मागे घेतले, तर आजअखेर १५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. यामुळे आता विविध मतदारसंघांमधून निवडणुकीच्या रिंगणात २२४ उमेदवार शिल्लक राहिले असून अंतिम लढतीचे चित्र २१ तारखेनंतर स्पष्ट होणार आहे.

बँकेसाठी मतदारसंघनिहाय शिल्लक अर्ज अकोले सोसायटी मतदार संघः ११ उमेदवार, जामखेड सोसायटी मतदार संघ ३ उमेदवार, कर्जत सोसायटी मतदार संघ १० उमेदवार, कोपरगाव सोसायटी मतदार संघ २ उमेदवार, अहिल्यानगर सोसायटी मतदार संघ ३ उमेदवार, नेवासा सोसायटी मतदार संघ १ उमेदवार, पारनेर सोसायटी मतदार संघ ८ उमेदवार, पाथर्डी सोसायटी मतदार संघ ३ उमेदवार,उराहाता सोसायटी मतदारसंघ २ उमेदवार, राहुरी सोसायटी मतदार संघ ३ उमेदवार, संगमनेर सोसायटी मतदार संघः १ उमेदवार, शेवगाव सोसायटी मतदार संघ २ उमेदवार, श्रीगोंदा सोसायटी मतदार संघ ९ उमेदवार, श्रीरामपूर सोसायटी मतदार संघः ४ उमेदवार, शेतीपूरक मतदार संघः२६ उमेदवार, बिगरशेती मतदार संघ ३१ उमेदवार, महिला राखीव प्रतिनिधी मतदारसंघ ४१ उमेदवार, विशेष मागास वर्ग मतदार संघ १८ उमेदवार, अनुसूचित जाती / जमाती मतदार संघ १२ उमेदवार, इतर मागास वर्ग मतदार संघ ३८ उमेदवार जिल्हा बँकेच्या या निवडणुकीकडे संपूर्ण सहकार क्षेत्राचे लक्ष लागले असून, माघार प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता प्रचाराचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

### दलित पँथरची धुरा दिपकेंसारख्या व्यक्तींच्या हाती जाता कामा नये

आणि उद्दिष्टे कायम ठेवणे, हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. आठवले यांच्या विधानामुळे दलित पँथरचे नेतृत्व, संघटनात्मक पुनर्रचना आणि आगामी काळातील भूमिका यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, अभिजित दिपके यांच्याबाबत आठवले यांनी केलेल्या टीकेवर संबंधितांकडून काय प्रतिक्रिया येते, याकडेही लक्ष लागले आहे. त्यांच्या प्रतिक्रियेनंतर या विषयावरील राजकीय आणि सामाजिक चर्चेला आणखी दिशा मिळू शकते.

### दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन

कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी मंत्रालयात मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची भेट घेऊन यासंदर्भातील पत्र दिले. ऑक्टोबर २०२६ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याची विनंती महासंघाने पत्रात केली आहे या निर्णयामुळे राज्यातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांकडून सुमारे ५० कोटी १० लाख रुपयांची मदत उपलब्ध होणार आहे.